# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन

## :: प्रेस नोट ::

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे                                   दिनांक 03/08/2023

**तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे कडील गुन्हे प्रकटीकरण पथकाकडुन मोटार सायकल चोरीचे तसेच घरफोडी चोरीचे चार गुन्हे उघड एकुण 2,21,500/— रू. किंमतीचा मद्देमाल जप्त**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे हद्दीमध्ये मोठया प्रमाणात लोक वसाहत असल्याने अज्ञात व्यक्तीकडुन मोटार सायकल आणि घरफोडी होत होत्या. त्याप्रमाणे सदर मोटार सायकल चोरी आणि घरफोडी चोरीस आळा घालणेबाबत तसेच प्रतिबंध करण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन यांनी वाहन चोरांकडुन तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे हद्दीतील गुन्हे उघड करण्याबाबत तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना आदेशित केले होते. त्यानंतर पोलीस उप निरीक्षक विजय जगदाळे व पथकातील अंमलदार हे वाहन चोरीच्या घटनास्थळावर भेट देवुन सदर परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज गोळा करून गोपनिय बातमीदार व तांत्रिक तपासाचा वापर करून मोटार सायकल चोरीच्या आरोपींचा शोध घेत होते.

दिनांक 29/07/2023 रोजी तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक विजय जगदाळे, स. फौजदार दिलीप कदम, पो.हवा.646/प्रितम वाघ, पो.ना.1446/किशोर गिरीगोसावी, पो.अंमलदार 3048/उमाकांत नवगिरे, पोलीस अंमलदार 3471/निखील देशमुख, पोलीस अंमलदार 3444/विवेक अंभोरे हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस उप निरीक्षक विजय जगदाळे व तपास पथकास बातमी मिळाली की, रेकॉर्ड वरील आरोपी 1) राहुल दगडु शिंदे वय 22 वर्षे, रा.वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे 2) राहुल अंकुश क्षिरसागर 23 वर्षे, रा. माकडवस्ती, देहुरोड, ता.हवेली, जि.पुणे हे तळेगाव दाभाडे परिसरात येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने तपास पथकातील पेट्रोलिंग करीत असलेल्या अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सापळा लावुन आरोपींना तपास पथकाने ताब्यात घेतले. त्यानंतर सदर आरोपी यांना ताब्यात घेतल्यानंतर सदर आरोपींकडे अतिशय कौशल्यपुर्ण तपास केला असता रेकॉर्डवरील आरोपी 1) राहुल दगडु शिंदे वय 22 वर्षे, रा.वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे 2) राहुल अंकुश क्षिरसागर 23 वर्षे, रा. माकडवस्ती, देहुरोड, ता.हवेली, जि.पुणे याने यापुर्वी वेळोवेळी तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे हद्दीतुन चोरी केलेल्या एकुण 04 मोटारा सायकली ताब्यात घेण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर आरोपी यांच्याकडुन घरफोडी केलेला मुद्देमाल टी.व्ही व इतर मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

जप्त केलेल्या एकुण मोटार सायकलीचे वर्णन खालिलप्रमाणे

| अ.क्र. | किंमत | जप्त वाहनाचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | 20,000/— | स्प्लेंडर प्लस आय—3—एस, मोटार सायकल **MH-14-HT-1363** चेसिस नं.**MBLHAW085K5F10183**, जु.वा.कि. |
| 2 | 15,000/— | सुझुकी एक्सेस स्कुटी मोटार सायकल **MH-14-DV-8368,**. इंजिन नं. **F4862268540,** चेसिस नं. **MB8CF4CABD8363603**, जु.वा.कि. |
| 3 | 1,50,000/— | होंडा सी.बी.आर.250, मोटार सायकल क्र.**MH-14-FU-6747** चेसिस नं. **ME4MC451GG8000529**, इंजिन नं.**MC45E80002570 जु.** |
| 4 | 20,000/— | होंडा कंपनीची काळया रंगाची,मोटार सायकल क्र. **MH-14-FP-1316** चेसिस नं. **ME4JC651DGT225086**, इंजिन नं. **JC65ET0334451 जु.** |

अटक आरोपीकडुन तळेगाव दाभाडे पोलीस ठाणेकडील उघड झालेले गुन्हे

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम | जप्त मोटार सायकल |
|---|---|---|---|
| 1 | तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे | 131/2023 कलम 379 भादवि | **MH-14-HT-1363** |
| 2 | तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे | 123/2023 कलम 379 भादवि | **MH-14-DV-8368** |
| 3 | तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे | 301/2023 कलम 379 भादवि | **MH-14-FU-6747** |
| 4 | तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे | 337/2023 कलम 379,380, 454,457 भादवि | **MH-14-FP-1316** व इतर मद्देमाल |

तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी अतिशय शिताफीने व कौशल्यपुर्ण तपास करून अटक आरोपी नामे 1) राहुल दगडु शिंदे वय 22 वर्षे, रा.वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे 2) राहुल अंकुश क्षिरसागर 23 वर्षे, रा. माकडवस्ती, देहुरोड, ता.हवेली, जि.पुणे यांच्याकडुन 2,21,500/- रू. किंमतीच्या 04 मोटार सायकली जप्त करून चांगली कामगिरी केलेली आहे. मा.पोलीस आयुक्तसो-श्री.विनयकुमार चोबे, मा.सह पोलीस आयुक्तसो-श्री.संजय शिंदे, मा.अप्पर पोलीस आयुक्तसो-श्री.वसंत परदेशी, मा.पोलीस उप आयुक्तसो परिमंडळ 2-श्री. काकासाहेब डोळे, मा.सहायक पोलीस आयुक्तसो-श्री.पद्माकर घनवट यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक-श्री.सत्यवान माने, पोलीस निरीक्षक(गुन्हे)-श्री.किशोर पाटील, पोलीस उप निरीक्षक-विजय जगदाळे, स.फौजदार दिलीप कदम, पो.हवा..646/प्रितम वाघ, पो.हवा..1400/प्रशांत निळे, पो.हवा..488/रघुनाथ बगाड, पो.ना..1446/किशोर गिरीगोसावी, पो. अंमलदार 3048/उमाकांत नवगिरे, पोलीस अंमलदार 3471/निखील देशमुख, पोलीस अंमलदार 3444/विवेक अंभोरे यांनी केलेली आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्तसो,
परिमंडळ-2, पिंपरी चिंचवड